नाशिक शहर TODAY

सकाळ
नाशिक, सोमवार,
२२ सप्टेंबर २०१४
४




नाशिक : वर्ल्ड समीट फॉर एथिक्स इन स्पोर्टस्‌च्या शिखर परिषदेस उपस्थित श्री श्री रविशंकर, डॉ. संजय प्रधान, नीरज देव, आरोज पेतारले, रंजिता कुलकर्णी आदी.

# युवकांच्या हाती हवी बंदुकीऐवजी क्रिकेटची बॅट : श्री श्री रविशंकर

सकाळ वृत्तसेवा

नाशिक, ता. २१ : सामाजिक प्रश्न सोडविण्यात क्रीडा क्षेत्राची भूमिका ठरविण्यासाठी, तसेच या क्षेत्रातील नैतिकता जपण्यासाठी झुरिच येथे प्रथमच क्रीडा, राजकारण, उद्योग व शिक्षण आदी क्षेत्रांतील मान्यवर प्रथमच एकत्र आले होते.

जगातील तरुणांत असलेली प्रचंड शक्ती खेळाच्या माध्यमातून वापरली गेली पाहिजे, असे परिषदेच्या मुख्यालयात मार्गदर्शन करताना 'वर्ल्ड समीट फॉर इथिक्स इन स्पोर्टस्'चे सह संस्थापक श्री श्री रविशंकर यांनी सांगितले. युवकांच्या हातात बंदुकीच्या जागी फुटबॉल किंवा क्रिकेटची बॅट दिल्यास ते जागतिक शांततेच्या दृष्टीने महत्त्वाचे पाऊल ठरेल, असे ते म्हणाले. पंतप्रधान नरेंद्र मोदी, भारतीय क्रिकेट संघाचा कर्णधार महेंद्रसिंह धोनी यांनीही या परिषदेसाठी संदेश पाठविला होता.